वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. २३ जून २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडमध्ये चक्क पाझर तलाव गेला चोरीला

## कागदपत्रावर आहेत तलाव मात्र प्रत्यक्षात तलावच नाही







Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

## संबंधितावर कारवाई होत नाही तो पर्यंत आमरण उपोषण -बबन झांबरे

**आष्टी, (दिव्य न्युज):-गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा गुन्हेगारी घटनांमुळे सतत चर्चेत आहे. आताही बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दैठणा गावात चक्क पाझर तलाव चोरीला गेल्याची घटना घडली आहे. जी जमीन शासनाने तलावासाठी संपादित केली होती, त्या जागेवर तलाव नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना संपादनाचे पैसे मिळालेले नाही. त्यामुळे बबन झांबरे यांच्यासह ग्रामस्थांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.**

समोर आलेल्या माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील दैठणा परिसरातील गात ४ मधील पाझर तलाव कागदपत्रावर आहे मात्र प्रत्यक्षात तलावच अस्तित्वात नाही. गेली २० वर्षांपासून बबन झांबरे हे तलावाचा पाठपुरावा करत आहेत, तलाव शोधण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र अद्याप त्यांना तलाव सापडलेला नाही. त्यामुळे तलाव ज्यांनी चोरी केला आहे त्या आधिकाऱ्यांवर आणि संबंधित व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी



मागणी करत बबन झांबरे व ग्रामस्थांनी आष्टी तहसील कार्यालयसमोर आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे.

याबाबत बोलताना बबन झांबरे यांनी म्हटले की, माझी जी जमीन तलावासाठी संपादित करण्यात आली आहे तिथे तलाव नाही. मात्र जिथे तलाव बांधलेला आहे तिथली जमीन संपादित झालेली नाही. त्यामुळे आम्हाला त्रासाचा सामना करावा लागत आहे. गावातील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्ती प्रशासन हाताशी धरुण आमच्यावरच खोटे गुन्हे दाखल करतात. जो पर्यंत चौकशी होऊन संबधीतांवर कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण माघे घेणार नाही. न्याय नाही मिळाला तर आत्महदन करु.याबाबत बोलताना सरपंच संभाजी झांबरे यांनी म्हटले की, 'मौजे दैठणा गात अ ४ हा तलाव २००७ पासून तलाव चोरीला गेला आहे. हा तलाव कागदावर दाखवला जात आहे. मात्र तलावासाठी संपादित झालेल्या जागेवर गेल्यास तिथे तलाव नाही. त्यामुळे चोरीला गेलेला तलाव आम्हाला सापडून द्यावा. तसेच ज्या लोकांना तलाव चोरी केला आहे, त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात यावी.'

## रान डुक्करांच्या हल्ल्यात वारकरी शेतकऱ्याचा मृत्यू



धारूर, (दिव्य न्युज):- धारूर तालुक्यात रानडुक्करांच्या त्रासाला शेतकरी वैतागलेले असतानाच एक अंत्यत दुःखद घटना घडली आहे. धारूर तालुक्यातील रूई धारूर येथील शेतकरी प्रकाश गोविंदराव तिडके वय ५७ वर्षे यांचा रान डुक्करांच्या हल्लयात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.धारूर तालुक्यातील रुई धारूर येथील प्रतिष्ठित व सांप्रदायिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व प्रकाश गोविंदराव तिडके हे २२ जून रविवार रोजी सकाळी पाच वाजता आपल्या गावातील घरातून शेतात दुध आणायला मोटारसायकल वरून जात असताना गावाजवळील ओढ्याजवळ चार ते पाच डुक्करांच्या कळपाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला.या हल्लयात ते रोडवर पडले त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना तात्काळ लातूर येथील सह्याद्री हॉस्पीटल येथे दाखल केले परंतू डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. रानडुक्करांच्या हल्लयाने एक निष्पाप शेतकऱ्यांचा नाहक जीव गेला यामुळे गावात व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे

## खापरटोन शिवारात चोरट्यांचा धुमाकूळ

## पावणेपाच लाखांच्या शेळ्या व पिल्लांची चोरी

अंबाजोगाई , (दिव्य न्युज):- तालुक्यातील खापरटोन शिवारात अज्ञात चोरट्यांनी पोल्ट्री शेडमधून एकूण ४ लाख ७२ हजार रुपये किमतीच्या शेळ्या, बोकड व पिल्ले चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बालाजी मुरलीधर फड यांनी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फड यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते आपल्या कुटुंबासह खापरटोन येथे राहतात. त्यांचा शेळीपालनाचा व्यवसाय असून त्यांच्या ताब्यात ३८ शेळ्या, २ बोकड व १५ पिल्ले होती. तसेच त्यांच्या लहान भावाकडे ८ शेळ्या आणि ७ पिल्ले असा एकूण १५ शेळ्यांचा संच होता. दोघांनी मिळून खापरटोन शिवारातील संतोष व मोतीराम त्रिंबक फड यांच्या पोल्ट्री ▸▸ पान २ वर

## माझ्या मुलांसाठी तिकीट मागत नसल्याने पक्षातील अनेकांची अडचण-नितीन गडकरी

मुंबई , (दिव्य न्युज):- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आपल्या परखड आणि स्पष्ट मतांसाठी प्रसिद्ध आहे. यामुळे अनेकदा त्यांच्या समोर अडचणही निर्माण होते. परंतु, त्याला न जुमानत गडकरी कायम आपल्या मतावर स्पष्ट असतात. अनेकदा त्यांनी स्वपक्षालाही धडा दिलेला आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी नागपुरात झालेल्या अशाच एका कार्यक्रमात त्यांनी भाजप नेत्यांचे कान टोचले.

भाजप हा जातीयवादी किंवा सांप्रदायिक पक्ष नाही. त्यामुळे भाजपमध्ये विविध जातींचे संघटन उभे करणे ही चूक आहे. मी माझ्या राजकीय जीवनात ही चूक केली होती. परंतु, यातून कुठलीही जात आपल्यासोबत जोडली जात नाही. जातीय ▸▸ पान २ वर



बीड : बिंदुसरा नदीपात्र एका बाजूने मोकळं केलं जातंय तर दुसऱ्या बाजूने भरलं जातंय? ज्यांना स्वच्छतेचं महत्व नाही अशा वृतीच्या लोकांना दंड किंवा दंडूकेचं हवेत त्याशिवाय बिंदूसरा नदी पात्राचं हे दुखणं बंद होणार नाही? नाही तर स्वच्छतेच्या नावाखाली उगीच जनतेचा पैसा पाण्यात नको?

## धारूर घाटात कार ३०० फूट दरीत कोसळली

### दोघे सख्खे भाऊ गंभीर जखमी

किल्लेधारूर, (दिव्य न्युज):- धारूर घाटातील अरुंद रस्ता आणि निकामी संरक्षण भिंतीमुळे अपघातांची मालिका थांबायचे नाव घेत नाहीये. रविवारी (दि. २२ जून) सकाळी सुमारास धारूरहून माजलगावकडे जाणारी कार घाटातील एका वळणावरून थेट ३०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात कारमधील दोघे सख्खे भाऊ गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातग्रस्त कार ही हुंडाई कंपनीची असून तिचा क्रमांक एमएच २२ डब्ल्यू २३६३ असा आहे. कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने आणि रस्त्यालगत असलेली संरक्षण भिंत निष्क्रिय झाल्याने ही कार खोल दरीत कोसळली. अपघातात भीमराव पायाळ (वय ५८) आणि संदीप पायाळ (वय ५६) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी दोघांनाही धारूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात केले. जखमींना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.धारूर घाटातील रस्ता अरुंद असून संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या भिंती अनेक ठिकाणी निकामी झाल्या आहेत. यामुळे अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. या भागातील प्रवासी आणि स्थानिक नागरिक अनेक वर्षांपासून घाट दुरुस्तीची मागणी करत आहेत.दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दोन दिवसांपूर्वी या घाट रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर केला असून, लवकरच काम सुरू होण्याची अपेक्षा आहे. धारूर घाटात अपघातांचे सत्र थांबविण्यासाठी तातडीने घाटाच्या रस्त्याची सुधारणा करणे अत्यावश्यक झाले आहे.

## आता थांबायचा विचार करावा

### भास्कर जाधवांकडून निवृत्तीचे संकेत



मुंबई , (दिव्य न्युज):- आठ वेळा निवडणूक जिंकल्यानंतर थांबायचा विचार करावा असं वाटतं, असे म्हणत शिवसेना नेते आणि माजी मंत्री भास्कर जाधव यांनी राजकीय संन्यास घेण्याचे संकेत आजच्या पत्रकार परिषदेतून दिले आहेत. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना, शिवसेना पक्षातून आपल्याला मंत्रिपदाची संधी मिळाली नाही, याबाबतची खंतही भास्कर जाधव यांनी आज बोलून दाखवली. तसेच, खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्यावर नाराजी दर्शवत मला शिवसेना पक्षात भाषणं करायची संधी मिळते, तसेच पक्षाच्या हितासाठी मी जे करायचं ते करतो. पण, मी कुणाची हुजरेगिरी कर नाहीत, हा ला हा किंवा ना ला ना... असं म्हणणारा मी कार्यकर्ता आहे, असेही भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेतून बोलून दाखवले. गुहागर मतदारसंघात आयोजित शिवसेना पक्षाच्या शिबीरानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

शिवसेनेचा शाखाप्रमुखच हाच शिवसेनेचा कणा होता, पण कुठेतरी शिवसेनेत शाखाप्रमुखच बाजूला होत असल्याचे मला दिसले, म्हणून त्याच अनुषंगाने आज शिवसेना पक्षाच्यावतीने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यकर्ते कमी होत आहेत म्हणून निवृत्ती घ्यायचं काहीच कारण नाही. ३९ जागांपैकी मी एकटा निवडून ▸▸ पान २ वर




## राशनवरील धान्य तीन किलोने कमी

### आम्हाला गोडाऊनमधूनच कमी येते,स्वस्त धान्य दुकानदार

माजलगाव, (दिव्य न्युज):- स्वस्त धान्य दुकानातील बॅगमध्ये निर्धारित पेक्षा धान्याचे वजन कमी असल्याचे तालुक्यातील देपेगाव येथे ग्रामस्थांना निदर्शनास आले आहे. दोन ते तीन किलो धान्य कमी मिळत असल्याचे वजन केल्यानंतर स्पष्ट झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत धान्य घोटाळा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आली. याबाबत शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी प्रशासनाला जाब विचारात दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

तालुक्यातील देपेगाव ग्रामस्थांनी राशन कमी मिळत असल्याबाबत तक्रारी करूनही पुरवठा विभागाचे याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे गावकऱ्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वात राशन दुकानावरील धान्यांच्या बॅगच्या वजनाबाबत जाब विचारला.



यावेळी दुकानदार गंगाधर गिरी यांनी सांगितले की, आम्हाला गोडाऊन मधूनच अडीच ते तीन किलो धान्य कमी येते, आम्ही काही बोलायला गेलो तर आम्हाला धान्य दिले जात नाही. यामुळे माहित असूनही आम्हाला गप्प बसण्याची वेळ येते असल्याचे स्पष्टीकरण गिरी यांनी दिले.


### दोन ते तीन किलो धान्य कमी

यावेळी इलेक्ट्रिक वजन काट्यावर राशनच्या गहू आणि तांदळाच्या बॅगचे वजन ग्रामस्थांनी केले. अनेक बॅगमध्ये दोन ते तीन किलो पेक्षा कमी माल असल्याचे निदर्शनास आले. याबाबत तहसील प्रशासनातील अधिकारी विकास बळवंत यांच्याशी ड. गोले यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला. कमी असलेले राशन पुढच्या खेपेला देऊ असे बळवंत यांनी सांगितले. यावर जर तुम्ही कमी पडलेले धान्य देत असाल तर तुम्ही काढून घेतले आहे.. तुम्ही देणार नसाल तर ते नेमके कुठे गेले आहे..? असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

# होर्मुझ जलमार्ग बंद करून जगाच्या नाड्या आवळण्याच्या तयारीत

## अमेरिकेनं रात्रीत खेळ केला, पण इराण जोरदार हल्ल्याच्या तयारीत










दिल्ली, (वृत्तसेवा):-इराण आणि इस्त्रायल युद्धात थेट सहभाग घेणार की नाही याबाबत दोन आठवडे विचार करत असल्याचे सांगत अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगून एक दिवसही होत नाही तोपर्यंत इराणच्या ३ अणु तळांवर ७ बी-२ बॉम्बर्सने हल्ला केला. हे तळ इराणमधील फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान याठिकाणी होते. या हल्ल्याला 'ऑपरेशन मिडनाईट हॅमर' असे नाव देण्यात आले. अमेरिकेने फोर्डो आणि नतान्झवर ३० हजार पौंड (१४ हजार किलो) वजनाचे एक डझनहून अधिक ॠइण-५७ बॉम्ब (बंकर बस्टर) टाकले. त्याच वेळी, इस्फहान आणि नतान्झवर ३० टोमाहॉक क्रूझ क्षेपणास्त्रे देखील डागण्यात आली. हे ४०० मैल अंतरावर असलेल्या अमेरिकन पाणबुड्यांवरून डागण्यात आले. या कारवाईनंतर जागतिक संकट आणखी वाढलं असून इराणने इस्त्रायलवर सुद्धा हल्ल्यांमध्ये वाढ केली आहे.

दुसरीकडे, इराणने जगाची नाकेबंदी करण्यासाठी तगडा निर्णय घेतला आहे. इराणी संसदेने (लर्श्रीीिश`ष ींहश डीीरळीं`ष कींीि) होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्यास मान्यता दिली आहे. हे एक उच्च-स्तरीय भू-राजकीय पाऊल आहे ज्याचे आर्थिक आणि धोरणात्मक दोन्ही जागतिक स्तरावर मोठे परिणाम होऊ शकतात. जगावर आणि भारतावर त्याचा कसा परिणाम होतो आणि अमेरिका आणि इस्रायली आक्रमणाविरुद्ध हा एक मास्टरस्ट्रोक आहे का? अशीही चर्चा रंगली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी काय आहे? आणि ती इराणकडून बंद करण्यात आली, तर जलमार्ग बंद होऊन जगावर किती परिणाम होणार? याची माहिती घेऊया.

होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्यास मान्यता देण्याचा इराणचा निर्णय जुगार आणि पाश्चात्यांना दणका देण्यासाठी मास्टरस्ट्रोक सुद्धा ठरु शकतो. हा केवळ एक प्रतीकात्मक संकेत नाही तर संभाव्य आर्थिक आणि लष्करी फ्लॅशपॉइंट आहे. पाश्चात्य आक्रमकतेला मागे टाकण्याचे उद्दिष्ट असले तरी, ते व्यापक संघर्ष निर्माण करू शकते आणि जागतिक ऊर्जा प्रणालीमध्ये व्यत्यय आणू शकते, ज्यामुळे प्रत्येक राष्ट्रावर, विशेषतः भारतासारख्या तेलावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांवर परिणाम होऊ शकतो.

होर्मुझची सामुद्रधुनी काय आहे? थहरीं ळी ींहश डीीरळीं`ष कींीि?

पर्शियन आखात आणि अरबी समुद्रामधील एक धोरणात्मक ठिकाण

सौदी अरेबिया, युएई, इराक, कुवेत, कतार सारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांना जागतिक बाजारपेठांशी जोडते.

जागतिक तेल पुरवठ्यापैकी २० टक्के (अंदाजे १७-१८ दशलक्ष बॅरल/दिवस) या अरुंद मार्गातून जातो.

विशेषतः कतारमधून एलएनजी निर्यातीसाठी देखील हे महत्त्वाचे आहे,

इराणने हा निर्णय का घेतला?

अमेरिका आणि इस्रायली लष्करी कारवाई आणि निर्बंध वाढले.

आण्विक तळांवर हल्ला तसेच अणुशास्त्रज्ञ आणि लष्करी जनरल यांची हत्या

ट्रम्प यांचे हवाई हल्ले किंवा आखाती प्रदेशातील हस्तक्षेप

होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून काय करु शकतो?

इराण सामुद्रधनी एक फायदा म्हणून पाहतो

जागतिक तेल पुरवठा साखळ्यांना धक्का बसणार

राजनैतिकदृष्ट्या पाश्चात्य शक्तींवर दबाव वाढेल

जागतिक आर्थिक हितसंबंधांना धोका निर्माण करून प्रतिबंध

होर्मुझची सामुद्रधुनी बंद करताच जगावर किती परिणाम होणार?

१. तेलाच्या किमती गगनाला भिडतील

जागतिक तेलाच्या किमतींमध्ये तात्काळ वाढ (दीर्घकाळ राहिल्यास १५०/बॅरलपेक्षा जास्त असू शकते)

जागतिक अर्थव्यवस्थेला महागाईचा धक्का

आखाती तेलावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांना त्याचा फटका बसेल

२. शिपिंग आणि व्यापार व्यत्यय

तेल आणि गॅस टँकरमध्ये व्यत्यय

आखाती शिपिंगसाठी वाढलेले विमा प्रीमियम

जहाजांचे मार्ग बदलल्याने जागतिक स्तरावर लॉजिस्टिक्स खर्च वाढेल

३. मध्य पूर्वेत लष्करी तणाव

बहारीनमध्ये स्थित अमेरिकेचा पाचवा फ्लीट लष्करी प्रतिसाद देऊ शकतो.

यामध्ये पूर्ण प्रादेशिक युद्धाचा धोका

इराण, अमेरिका, इस्रायल, जीसीसी राष्ट्रे (विशेषतः सौदी अरेबिया, युएई).

इस्रायल पूर्वसूचना किंवा सायबर ऑपरेशन्स सुरू करू शकते.

भारतावर काय परिणाम होईल?

भारताची ऊर्जा सुरक्षा धोक्यात

भारत त्याच्या कच्च्या तेलाच्या जवळजवळ ८० ते ८५




टक्के आयात करतो, ज्यामध्ये मोठा वाटा आखाती देशांकडून येतो.सामुद्रधुनी बंद केल्याने पुढील गोष्टी घडू शकतात

पुरवठा टंचाईआयात बिलांमध्ये वाढ आणि चालू खात्यातील तूट वाढ रुपयावर दबाव आणि देशांतर्गत इंधनाच्या किमतींमध्ये वाढ एलएनजी आणि खत क्षेत्र धोक्यात

भारत सामुद्रधुनी मार्गे प्रामुख्याने कतारमधून एलएनजी आयात करतो.

बंदमुळे खत, वीज आणि औद्योगिक क्षेत्रांवर मोठा परिणाम होईल.

भारताला संबंध संतुलित करावे लागतील

इराण (दीर्घकाळ भागीदार) आणि अमेरिका/इस्रायल (सामरिक सहयोगी) यांच्यात.

चाबहार बंदर विस्तार आणि पर्यायी व्यापार मार्ग (खछडढउ) साठी संभाव्य दबाव.

# एसटी डेपोची गर्दी संपली!

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार आता सरकारने विद्यालयात एसटीचे पास देण्याची व्यवस्था केल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापुढे एसटी प्रवासाचे पास मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना एसटी डेपोत जाऊन लांबच लांब रांगेत उभे राहण्याची गरज भासणार नाही. आता हे पास थेट शिक्षण संस्थांमधूनच देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचा वेळ आणि श्रमाची बचत होणार आहे.

शाळा-कनिष्ठ महाविद्यालये आणि महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळ विविध प्रकारचे मासिक, त्रैमासिक आणि अर्धवार्षिक पास देते. आतापर्यंत हे पास एसटी डेपोत जाऊन मिळवावे लागत होते. नवीन योजनेनुसार शाळा-महाविद्यालयांमार्फतच सामूहिक अर्ज करून विद्यार्थ्यांना वर्गातच हे पास वितरित करण्यात येत आहेत.पूर्वी हजारो विद्यार्थी एसटी डेपोमध्ये पास मिळवण्यासाठी दिवसभर रांगेत उभे राहत असतं. कधी-कधी दोन-तीन दिवस प्रयत्न करावे लागत. त्यामुळे शाळेच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना पास मिळवण्यासाठी गैरहजर राहावे लागत होते. मात्र, आता विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार आहे, तसेच शाळेपासून डेपोपर्यंतचा त्रास टळणार आहे. शाळेतच पासचे वितरण होत असल्याने सर्वांना वेळेत पास उपलब्ध होणार आहे.

शिकण्यासाठी घरून निघून पुढे एसटीने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी पास मिळतो. या नव्या उपक्रमामुळे त्यांचा शिक्षणाकडे ओढा वाढणार आहे. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी महामंडळाचे पास एसटी डेपोत जाऊन मिळवावे लागत होते. नवीन योजनेनुसार विद्यार्थ्यांना वर्गातच हे पास मिळत आहेत.प्रत्येक शाळा-महाविद्यालय आपल्या विद्यार्थ्यांची माहिती गोळा करून एसटी विभागाला एकत्रित स्वरूपात अर्ज सादर करीत आहेत. गोंदियात एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रत्येक शाळांत जाऊन अर्ज भरून घेऊन शाळेतच पास वाटप करीत आहेत.

# एलएलबी. प्रि परीक्षेत ९९.९९%गुण घेत शेख शोएब महाराष्ट्र प्रथम

बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र शासन मुबंई कडून मे २०२५ मध्ये एलएलबी साठी राज्य कॉमन इंट्रान्स परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा निकल काल जाहीर झाला असून त्यात शेख शोएब जिल्हा वक्फ ऑफिसर संभाजी नगर (औरंगाबाद )यांनी ९९.९९% गुण घेत महाराष्ट्रतुन प्रथम क्रमांक मिळवला आहे.



शेख शोएब हे नेहमी शैक्षणिक क्षेत्रात विविध परीक्षेत सहभागी होतात. त्यांनी आज पर्यंत बीई सिव्हिल केल्यानंतर नियमित शिक्षणाचा ध्यास चालू ठेवत एमए, बीएड, एमएड, एमए एज्युकेशन,नेटसेट, टेट परीक्षेत यश संपदान केले.तसेच इतर संपर्कातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक ओढा लावत त्यांचे शैक्षणिक दर्जा वादविण्यास प्रयत्न करतात. एलएलबी प्रि परीक्षेत महाराष्ट्रतुन प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल त्यांचे महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे अध्येक्ष मा. ना.समीर काजीं,बोर्डाचे सीइओ मा. जुनेद सय्यद,वूलशे मा. मुशीरखान, सर्व जिल्हा वक्फ ऑफिसर, सहकारी मित्रांनी अभिनंदन केले असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

पान १ वरून

## खापरटोन शिवारात

शेडचा वापर शेळ्या बांधण्यासाठी केला होता.दि. २१ जून रोजी सायंकाळी ६ वाजता पावसाच्या पार्श्वभूमीवर शेळ्या शेडमध्ये सुरक्षित ठेवल्या व दोन्ही गेट कुलूप लावून चाव्या स्वतःकडे ठेवल्या. रात्री दोघेही शेतीतील हॉटेलमध्ये झोपले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी २२ जून रोजी सकाळी ६ वाजता शेडकडे गेल्यावर गेटचे कुलूप तुटलेले व मागील जाळी फाटलेली आढळली. आत तपासणी केली असता एकूण ४८ शेळ्या-बोकड व २२ पिल्ले चोरीला गेल्याचे उघड झाले. चोरी गेलेल्या शेळ्यांची अंदाजित किमत ४ लाख ७२ हजार रुपये असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## माझ्या मुलांसाठी तिकीट

संघटनांच्या अध्यक्षांना त्यांच्या जातीत कोणीही विचारणारा नसतो असाच अनुभव आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. महापालिका निवडणूक आली की, या विविध जातींच्या संघटनांचे पत्र उमेदवारीसाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंकडे येतील. त्यावेळी त्यांना जातीय संघटना तयार करणे किती मोठी चूक होती हे कळून चुकेल, असेही गडकरी म्हणाले.

गडकरी म्हणाले, भारतीय जनता पक्ष हा आपला परिवार आहे. येथील प्रत्येक कार्यकर्ता या परिवाराचा सदस्य आहे. पक्षातील प्रत्येकाने आपल्या मुलांवर प्रेम करावे. मुलांना उमेदवारी मिळावी म्हणून प्रयत्न करावे. परंतु, आपला कार्यकर्ता हा सुद्धा आपल्या परिवाराचा एक सदस्य आहे. याप्रमाणे त्याच्यावर प्रेम करा. मी आजपर्यंत कधीही स्वतःच्या मुलांसाठी तिकीट मागितली नाही, माझी मुलं राजकारणात नाही, त्यामुळे पक्षातील अनेकांची अडचण होते असेही त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी भाजपच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.१९५२ पासून आजपर्यंत प्रतिकूल काळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या समर्पणामुळे भाजपसाठी आजचा दिवस उजाडला आहे. याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे. १९८० मध्ये भाजपची स्थापना झाली. त्यावेळी देशभर कार्यक्रम झाले. नागपुरात न्यु इंग्लिश हायस्कूलच्या मैदानात शांतीभूषण आणि राम जेठमलानी यांच्या उपस्थितीत हा सोहळा आयोजित करण्यात आला होता, अशी आठवणही गडकरी यांनी सांगितली.पक्ष कार्यालय हे आपल्या घराप्रमाणे आहे. अनेकांनी त्यासाठी परिश्रम घेतले आहे. हे केवळ शहराचेच नव्हे तर जिल्हा आणि विदर्भाचे महत्त्वाचे कार्यालय ठरणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. बावनकुळे यांनी पक्षाने आतापर्यंत दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष पूर्ण केल्याची माहिती दिली.

## आता थांबायचा

आलो आहे, परंतु शेवटी आठ-आठ वेळा वेगवेगळ्या निवडणुका जिंकल्यानंतर असं वाटतं की आता थांबायचा विचार करावा, यापेक्षा वेगळं कारण नाही, असे म्हणत भास्कर जाधव यांनी निवृत्तीच्या चर्चांवर स्पष्टीकरण दिले. तसेच, राजकीय निवृत्तीचे संकेतही आजच्या शिबीरानंतर आयोजित पत्रकार परिषदेतून दिले आहेत.

संजय राऊत मला दरवेळी सावरण्याची भाषा करतात. पण, मला भाषण करायला मिळत नाही म्हणून मी नाराज होत नाही. सगळ्या गोष्टींचे मला चांगल भान आहे. पक्ष मला भाषण करायला देत नाही म्हणून मी नाराज असा संदेश देण्याचा संजय राऊत यांचा प्रयत्न असतो. मात्र, पक्षाकडूनही कधीही तसं होत नाही. व्यासपीठावर शिवसेनेतील ज्येष्ठ नेते असतात, आदित्य ठाकरे हेही असतात. तरीही मला तिसऱ्या क्रमांकावर भाषण करायची संधी दिली जाते. माझ्यानंतर संजय राऊत आणि त्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे भाषण करतात, असे जाधव यांनी सांगितले. मला भाषण करायला मिळालं पाहिजे असं अजिबात म्हणणं नाही, भाषणाबद्दल नाराजीचा विषयच नाही, असेही जाधव यांनी स्पष्ट केले.

मला मंत्रिपद का दिलं नाही याच उत्तर कोणाकडे असेल तर त्यांनी द्यावे. माझ्यावर झालेला अन्याय मी उघडपणे सांगितला, यापुढेही सांगेन, असेही भास्कर जाधव यांनी परखडपणे म्हटले. दरम्यान, हिंदी सक्तीचा विषय मागे घेतला असताना मागच्या आठ दिवसात हा विषय का उफाळून आला याचा शोध घेणे गरजेचे आहे. हिंदी विषयाला विरोध हा केवळ मनसेचा विषय नाही, असेही जाधव यांनी म्हटले.